# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते

क्र.एचओ/9659 /लेखा दि. 24.06.2022

**<u>कंत्राटी बहुउदेशीय कामगार पदासाठी जाहिरात</u>**

**विषय** :- प्राथमिक आरोग्य सेवेचे बळकटीकरण आणि दर्जोन्नती तसेच आरोग्य सेवेचे सार्वत्रिकरण या संकल्पनेच्या अंमलबजावणी बाबत

**संदर्भ** :- MGC/F/6649/21-06-2022

सार्वजनिक खात्यांतर्गत प्राथमिक आरोग्य सेवेचे बळकटीकरण आणि दर्जोन्नती तसेच आरोग्य सेवेच सार्वत्रिकरण या संकल्पनेच्या अंमलबजावणी साठी मा.आयुक्त यांची अनुक्रमे क्र. MGC/F/6649/21-06-2022अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. या अंतर्गत सर्वसामावेशक आरोग्य सेवा नागरिकांना उपलब्ध करुन देण्यासाठी HBT Clinic सुरू करण्यात येणार आहे. सदर HBT Clinic साठी 10 वी पास इच्छुक उमेदवाराकडून कंत्राटी **बहुउदेशीय कामगार** पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. त्यानुसार सदर पदे स्थानिक पातळीवर पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवून निवडीने भरावयाची असल्याने सदर जाहिरात प्रसारित करण्यात येत आहे.प्रतिसादादाखल प्राप्त होणा-या अर्जांची आवश्यक कागदपत्रांसह छाननी करून प्रस्तवित पदांच्या प्रमाणात पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. नियुक्ती आदेश कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या कार्यलयामार्फत काढण्यात येतील.

कंत्राटी बहुउदेशीय कामगार पदासाठीची शैक्षणिक अर्हता व कंत्राटी तत्त्वावरील नियुक्तीच्या अटी / शर्ती / सर्वसाधारण नियम खालील प्रमाणे आहेत

**शैक्षणिक अर्हता :** 10 वी पास, शासन मान्य संस्थेमधून First AID course किंवा Para Medical course (Nursing care Assistant/General Duty Assistant/ Home-based health care/ Home Health Aide), Health assistant course केले असल्यास प्राधान्य देण्यात येईल. मराठी व इंग्रजी भाषा वाचता व लिहीता आली पाहिजे.

**वयोमर्यादा**: उमेदवाराचे वय दिनांक 1st July 2022. रोजी 38 वर्षापेक्षा अधिक असू नये.

**कामाचे स्वरुप :-**

1. दवाखान्याची साफसफाई दवाखाना सुरु होण्यापूर्वी करुन ठेवणे.
2. सदर दवाखान्यात येणा-या रुग्णांना रांगेत बसविणे.
3. आवश्यकता असल्यास वैद्यकीय अधिका-यांना रुग्णांच्या तपासणीसाठी मदत करणे,मलमपट्टी करणे, GNM ला रक्त नमुना घेतेवेळी आवश्यकता असल्यास मदत करणे.

**मानधन :-** या पदांसाठी मानधन Incentive वर अधरित आहे.

- दरमहा किमान निश्चित मानधन रुपये 17,000/- (अक्षरी रुपये सतरा हजार मात्र).
- दर दिवशी रुग्णसंख्या 50 च्या वर गेल्यास प्रती रुग्ण रु.5/- याप्रमाणे अधिक मानधन दिले जाईल. जेणेकरुन जर दररोज 90 रुग्ण तपासल्यास मासिक मानधन अंदाजे रु.20,000 इतके होईल.
- एका महिन्यात 2,500 किंवा त्यापेक्षा अधिक रुग्ण तपासल्यास बहुउदेशीय कामगार यांना रु. 1,000/- अतिरिक्त प्रोस्ताहन मानधन देण्यात येईल.

**निवडीचे निकष:-** शैक्षणिक अर्हतेच्या 10 वी पास गुणांच्या टक्केवारीनुसार उमेदवारांची निवड यादी तयार करण्यात येईल. प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. उमेदवार दोन किंवा तीन प्रयत्नांत उत्तीर्ण झाला असेल तर अंतिम गुणांमधून 5 गुण, 10 गुण वजा करण्यात येतील. तीन पेक्षा जास्त प्रयत्नांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. समान गुण धारण करणा-या अर्हता प्राप्त उमेदवारांना जन्मतारखेनुसार वयोजेष्ठतेने प्राधान्य देण्यात येईल.

**सर्वसाधारण अटी:**

1. सदर नियुक्त्या ह्या निव्वळ कंत्राटी तत्वावर असल्याने त्यांना महापालिकेत कायमस्वरुपी तत्वावरील नोकरीचा हक्क असणार नाही.
2. सदर कंत्राटी तत्वावरील नियुक्ती ही 180 दिवसांकरिता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असेल, 180 दिवसांनी एक दिवसाचा सेवाखंड देऊन काम समाधानकारक असल्यास पूर्ननियुक्ती करण्यात येईल.
3. निवड प्रकिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती /प्रमाणपत्रे/ कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याच निदर्शानास आल्यास त्याची उमेदवारीरद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

**अर्ज भरण्याचे ठिकाण :** इच्छुक उमेदावारांने आवश्यक ते कागद पत्रांसह अर्ज एफ/दक्षिण कार्यालय 3,मजला बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल मुंबई ,400 012 **एच.बी.टी. पॉली क्लिनिक सेल खोली क्र. 49 दि. 24.06.2022 ते 29.06.2022 सकाळी 11 ते संध्याकाळी 5 पर्यंत येथे जमा करण्यात यावा.**

अर्ज हा फॉरमेट प्रमाणे असावा आणि त्यासोबत सर्व आवश्यक ते कागदपत्रांसह असावा अन्यथा अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही. पात्र उमेदवारांना त्याच्या ई-मेल कळविण्यात येईल.

सही /-

**कार्यकारी आरोग्य अधिकारी**

बृहन्मुंबईमहानगरपालिका

सार्वजनिक आरोग्य खाते

अर्जाचा नमुना

पदाचे नाव-----------------------------

प्रति,

सहाय्यक आरोग्य अधिकारी (विलका),
एफ/दक्षिण, मुंबई महानगरपालिका विभाग कार्यालय इमारत,
धुसरा मजला, खोली क्र. ३२,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
परळ, मुंबई - ४०० ०१२

उमेदवाराने त्याचे अलिकडे काढलेलेपारपत्रआकाराचेछायाचित्र लावूनफोटोवरस्वाक्षरीकरावी
२.५ से.मी–३ से.मी

कोविड-१९लसीकरण कार्यक्रमासाठी वर नमूद केलेल्या पदा करीता दिनांक---------------- च्या जाहीराती नुसार मी--------------------------------------------------खाली सही करणार विनंती अर्ज सादर करीत आहे-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | (अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) | | |
| | (ब) वडिलाचे / पतीचे संपूर्ण नाव | | |
| | (क) उमेदवाराचे लग्नापूर्वी चे संपूर्ण नाव<br>(महिला उमेदवारांच्या बाबतीत) | | |
| २ | पत्ता (पत्रव्यवहराचा)<br>घर क्रमांक/इमारतीचे नाव<br>रस्त्याचे नाव विभागाचे नाव<br>आणि शहर पिनकोड नं.<br>टेलिफोन नं./मोबाईल नं. | | |
| ३ | लिंग (पुरुष / स्त्री) | | |
| ४ | (अ) जन्म दिनांक | | |
| | (ब) दिनांक रोजी असलेले वय---------- वर्षे -------------महिने-------------दिवस--------------- | | |
| ५ | जात / पोटजात / प्रवर्गजात<br>वैधता प्रमाण पत्राची छायांकित साक्षांकित प्रत सोबत जोडावी. | | |

| ५ शैक्षणिक अर्हता: (अ) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| परिक्षेचे नाव | शालांत परिक्षामंडळ/ विद्यापिठाचे नाव | गुणांचा तपशिल | | टक्केवारी | एस.एस.सी./ एच.एस.सी परिक्षेतील मराठी विषयातील गुण | | उत्तीर्णतेचे वर्ष |
| | | प्राप्तगुण | पैकी | | मराठी विषयातील प्राप्त गुण | पैकी | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

मी याअन्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करतेकी, वरील माहिती जाणीव पूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून,ती खरी आहे. जाहीरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. /त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्यावर माझी उमेदवारीरद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जा द्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे.

दिनांक:

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही

अर्जदाराचेनाव-

सोबत

१. 10 वी ची गुणपत्रीका
२. Para Medical course (Nursing care Assistant/General Duty Assistant / Home-based health care/ Home Health Aide)
३. Health assistant course केले असल्यास प्रमाणपत्र.
४. PHOTO
५. PAN CARD
६. AADHAR CARD